सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२३–२४/०६४ दिनांक : २५/०८/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : दिनांक ०१/०१/२०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रसह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे अंतर्गत महाविद्यालयामध्ये नव मतदार अभियानाचे आयोजन करणेबाबत**

**संदर्भ : पीईई ३/कावि/७७७/२०२३ दिनांक ०९ ऑगस्ट, २०२३ चे प्रत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदभीर्य पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते कि, मा. भारत निवडणूक आयोगाने दिनांक ०१/०१/२०२४ या अहर्ता दिनांकावर आधारित छायाचित्रसह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम जाहिर केलेला आहे. सदर पुनरिक्षण कार्यक्रमामध्ये पुनरिक्षण कार्यक्रमामध्ये पुनरिक्षण पुर्व उपक्रम आणि पुनरिक्षण कार्यक्रम या दोन भागांचा समावेश आहे. सदर कार्यक्रमा अंतर्गत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. दि. २१ जुलै ते ३० नोव्हेंबर २०२३ या कालावधी मध्ये नागरिकांकडून मतदार नोंदणीचे, मतदार यादीतील नोंदणीच्या दुरूस्ती वा वगळणी इत्यादी बाबत विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम पुणे जिल्हयातील २१ विधानसभा मतदार संघामध्ये राबविण्यात येत आहे.

मा. भारत निवडणूक आयोगाने लोक प्रतिनिधीत्व अधिनियम १९५० मध्ये सुधारणा केली असून आता वर्षातून चार वेळा म्हणजेच १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै, १ ऑक्टोबर या अहर्ता दिनांकावर मतदार नोंदणी करता येणार आहे.

या संबंधीचे सविस्तर पत्र, आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. शासन निर्देशानुसार वरील उपक्रम विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

कार्यालय: ०२०–२५६२२६८०, ०२०–२५६२२६८७,
ईमेल : bsd@unipune.ac.in संकेतस्थळ : http://www.unipune.ac.in/bsd

17 AUG 2023
5054
21 AUG 2023
विद्यार्थी विकास मंडळ
आवक क्रं. 0149
23 AUG 2023
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
3:40PM

डॉ. राजेश देशमुख
भा.प्र.से
जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, पुणे

दुरध्वनी: (कार्यालय): ०२० २६११४९४९
(निवास) : ०२० २६३६१८१८
जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, पुणे
१, फायनान्स रोड, पुणे – ४११ ००१.

क्रमांक : पोईई-३/कावि/७७५/२०२३
पुणे, दिनांक : ०९/०८/२०२३

विषय:- दिनांक ०१/०१/२०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्रसह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे अंतर्गत महाविदयालयामध्ये नव मतदार नोंदणी अभियानाचे आयोजन करणेबाबत.

मा.भारत निवडणूक आयोगाने दिनांक ०१/०१/२०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहिर केलेला आहे. सदर पुनरिक्षण कार्यक्रमामध्ये पुनरिक्षण पुर्व उपक्रम आणि पुनरिक्षण कार्यक्रम या दोन भागांचा समावेश आहे. मतदार यादीची गुणवत्ता राखण्यासाठी पुनरिक्षण पुर्व उपक्रम अत्यंत महत्वाचा आहे. सदर कार्यक्रमा अंतर्गत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी (Turnout Implementation Plan) विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. मतदारांचा एकुण सहभाग वाढवण्यासाठी लक्षित प्रयत्नांसह विविध माध्यमांव्दारे मतदानाच्या टक्केवारीत लक्षणिय वाढ करणे हे या कार्यक्रमाचे उदिष्ट आहे. त्याचा एक भाग म्हणुन दिनांक २१ जुलै २०२३ ते ३० नोव्हेंबर २०२३ या कालावधी मध्ये नागरिकांकडून मतदार नोंदणीचे, मतदार यादीतील नोंदणीच्या दुरुस्ती वा वगळणी इत्यादी बाबत विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम पुणे जिल्हयातील २१ विधानसभा मतदार संघामध्ये राबविण्यात येत आहे.

पुणे जिल्हयात अंतिम मतदार यादी दिनांक ०५/०१/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून सदर मतदार यादीत एकुण ७९,५१,४२० एवढे मतदार समाविष्ट आहेत. पुणे जिल्हयाची एकूण अंदाजित लोकसंख्या १.८ कोटी एवढी असून त्यामध्ये १८-१९ वयोगटातील लोकसंख्या ३,५९,८३९ इतकी आहे आणि १८-१९ वयोगटातील मतदार संख्या ६५,८५१ इतकी आहे. म्हणजेच २,९३,९८८ एवढे व्यक्ती हया मतदार होणेस पात्र होऊ शकतात. तसेच पुणे शहरामध्ये राज्याच्या विविध भागामधुन विदयार्थी शिक्षण घेणेकरिता येतात. ते शिक्षणासाठी पुणे मध्ये ३ ते ५ वर्ष राहतात. त्यामुळे या मुलांची मतदार नोंदणी पुणे मध्ये किंवा त्यांचे मुळ गावी होणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा व्यक्तींपर्यंत पोहोचणे हे निवडणूक विभागाचे कर्तव्य आहे!

पुणे जिल्हयात प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीच्या अनुषंगाने मा. भारत निवडणूक आयोग यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमामध्ये मा. मुख्य निवडणूक आयुक्त व मा. निवडणूक आयुक्त, भारत निवडणूक आयोग यांनी पुणे जिल्हयाच्या छायाचित्रासह मतदार यादीचा आढावा घेतला असता एकुण मतदार संख्येचा तुलनेत नवमतदारच्या नोंदणीचे प्रमाण वाढविणेचे आवश्यकता असल्याचे सूचित केले. त्या अनुषंगाने दिनांक २१ जुलै

२०२३ ते ३० नोव्हेंबर २०२३ या कालावधी मध्ये राबविल्या जाणा-या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत पुणे जिल्हयामध्ये नव मतदारांची नोंदणी वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणेच्या सूचना दिल्या आहेत.

मा. भारत निवडणूक आयोगाने लोक प्रतिनिधीत्व अधिनियम १९५० मध्ये सुधारणा केली असून आता वर्षातून चार वेळा म्हणजेच १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै, १ ऑक्टोबर या अर्हता दिनांकावर मतदार नोंदणी करता येणार आहे. या संधीचा लाभ घेऊन आगामी कालात पुणे जिल्हातील नवीन मतदार नोंदणी प्रोत्साहित करणे यावर भर देण्यात येणार आहे.

आपले संस्थेस दिनांक ३/८/२०२३ रोजी उपजिल्हाधिकारी तथा उप जिल्हा निवडणुक अधिकारी, पुणे यांनी प्रत्यक्ष भेट देवून सदर उपक्रमाबाबत माहिती दिलेली आहे.

आपले संस्थेच्या अंतर्गत ९ महाविदयालये आहेत. सदर प्रत्येक महाविदयालयातील १० विदयार्थीनींची निवड करण्यात येवून त्यांची नावे या कार्यालयास कळविण्यात यावीत. सदर विदयार्थीनींना या कार्यालयामार्फत दिनांक ७/०८/२०२३ ते ११/८/२०२३ या कालावधीमध्ये ऑनलाईन नाव नोंदणी करणे विषयी प्रशिक्षण देण्यात येईल. सदर प्रशिक्षित विदयार्थीनींमार्फत सर्व विदयार्थीनींना फॉर्म नं ६ व फॉर्म न ८ उपलब्ध करुन देण्यात येवून त्यांची नाव नोंदणी महाविदयालयातच करण्यात येणार आहे त्याकरिता आपणाकडील कॉम्प्युटर लॅब उपलब्ध करुन देण्यास विनंती आहे.

सदर अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे खालील प्रमाणे.

| अर्ज कशासाठी | अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे |
|---|---|
| मतदार यादीत नव्याने नाव नोदणी (नमूना ६) | १) रहिवास पुरावा लाईट बिल/पाणी पट्टी, आधार कार्ड, बँकेचे किंवा पोस्टाचे पास बुक, भारतीय पारपत्र, नोदणीकृत विक्रीखत, नोंदणीकृत भाडेकरार<br>२) वयाचा पुरावा - जन्म प्रमाणपत्र, आधारकार्ड, राज्यशिक्षण मंडळाने निर्गमित केलेले १० वी किंवा १२ वी चे प्रमाणपत्र,<br>३) सदर विदयार्थीनी वसतीगृहात राहत असलेस, वसतीगृह अधिक्षक यांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र ( सोबत नमुना दिला आहे ) |
| मतदारयादीतील/मतदान (Epic Card) कार्डातील दुरुस्ती / मतदार यादीमध्ये पत्ता बदलणे (नमूना ८) | रहिवास पत्याचा पुरावा लाईट बिल/पाणी पट्टी, आधार कार्ड बँकेचे किंवा पोस्टाचे पास बुक, भारतीय पारपत्र, नोदणीकृत विक्रीखत, नोंदणीकृत भाडेकरार<br>वयाचा पुरावा-जन्म प्रमाणपत्र, आधारकार्ड, राज्यशिक्षण मंडळाने निर्गमित केलेले १० वी किंवा १२ वी चे प्रमाणपत्र, पारपत्र |

सदर अर्ज हे ऑनलाईन स्वरुपात देखील भरता येत असुन हे अर्ज https://voters.eci.gov.in या लिंकवरुन भरता येतात. तसेच Voter Search Helpline app व्दारे ही भरता येतात. सदर ॲप हे मोबाईलवर Playstore वरुन डाऊनलोड करता येते.

तरी सदर मोहीमेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य यांची भूमिका अतिशय महत्वाची आहे. आपले संस्थेच्या अधिनस्त सर्व महाविद्यालयामधील सर्व पात्र विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी करिता आपले स्तरावरुन सर्व विद्यार्थीनींना अवगत करावे. सदर विदयार्थीनींची माहिती खालील नमुन्यामध्ये तयार करुन या कार्यालयास कळवावी.

**महाविदयालाचे / संस्थेचे नाव :-**

| अ.क्र. | विदयार्थीनींची एकूण संख्या | एकूण विदयार्थीनी संख्येपैकी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १७-१८ वयोगटातील विदयार्थीनी | १८-१९ वयोगटातील विदयार्थीनी | १९-२० वयोगटातील विदयार्थीनी | २० चे पुढील वयोगटातील विदयार्थीनी |

| **एकूण विदयार्थीनींपैकी सदर कॅम्पमध्ये नोंदणी केलेल्या विदयार्थीनींची संख्या** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७-१८ वयोगटातील विदयार्थीनी | | | १८-१९ वयोगटातील विदयार्थीनी | | | १९-२० वयोगटातील विदयार्थीनी | | | २० चे पुढील वयोगटातील विदयार्थीनी | | |
| ऑन लाईन | ऑफ लाईन | एकूण | ऑन लाईन | ऑफ लाईन | एकूण | ऑन लाईन | ऑफ लाईन | एकूण | ऑन लाईन | ऑफ लाईन | एकूण |

सदर मोहिमेत भाग घेतलेल्या नोडल विदयार्थीनींना व महाविद्यालय यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार असून जास्तीत जास्त नव मतदारांची नोंदणी करणा-या महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा व सहभागी विद्यार्थ्यांचा २५ जानेवारी २०२४ रोजीच्या राष्ट्रीय मतदार दिवशी गौरव करण्यात येणार आहे. सदर अभियानाचा उद्देश हा आपले महविदयालयांमध्ये १०० टक्के मतदार नोंदणी, हा असून पुणे जिल्हयातील महाविदयालयामध्ये मतदार नोंदणी करणेचा शुभारंभ आपले महाविदयालयामधुन करावयाचा आहे.

मतदार यादी हा लोकशाहीचा पाया असून तो सशक्त करण्यासाठी मा.भारत निवडणूक आयोगाचा उपरोक्त विशेष अभियान आहे. मतदार यादी शुध्दीकरणासाठी मतदारांमध्ये जनजागृती करुन युवा मतदारांची

नोंदणी वाढविणे हे राष्ट्रीय कर्तव्य असून सदर कर्तव्यामध्ये आपला बहुमोल सहभाग अपेक्षित आहे. तरी सदर अभियान यशस्वी करण्यासाठी आपल्या संस्थेचा सहभाग व सहकार्य लाभेल, अशी मी आशा करतो!

आदरपूर्वक

आपला स्नेहांकित

(डॉ. राजेश देशमुख)
जिल्हाधिकारी, पुणे तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी,पुणे

प्रति,

श्री पी. व्ही. एस. शास्त्री

सचिव, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था,पुणे

प्रत- १. मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर

२. मा. कुलगुरु सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सविनय सादर

३. मतदार नोंदणी अधिकारी, १९५ ते २१५ विधानसभा मतदार संघ यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

# प्रमाणपत्र

प्रमाणित करणेत येते की, कुमारी -------------------------------------------------, वय ------ ही विदयार्थीनी --------------------------------------------------------------------------- -------------------- या महाविदयालयात -------------------- या वर्गात शिकत आहे. तसेच सदय:स्थितीत सदर विदयार्थीनी -------------------------- ----------------------------------------------------------------------------------- या वसतीगृहात रहात आहे. सदरचे प्रमाणपत्र मतदार यादीत नाव नोंदणी करणेकरिता देण्यात येत आहे.

वसतीगृह अधिक्षक यांचा सही व शिक्का